महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
**४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४**
दूरध्वनी क्र. ०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. ०१९ २२२१८०० Website : www.mahaawaas.org
Email ID: directoriayruralhousing@gmail.com Maha Awaas :

जा.क्र.रा.व्य.क.-ग्रा.गृ./बांध/RHE/123/२०२५ दि.१३.०१.२०२५

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद,
अमरावती, अहमदनगर, कोल्हापूर, नांदेड, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, रत्नागिरी, वर्धा, सातारा, गडचिरोली, नाशिक, पालघर, पुणे, ठाणे, रायगड व यवतमाळ.

**विषय:- केंद्र पुरस्कृत PM-JANMAN अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनाबाबत.**

**संदर्भ :** १. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड यांचेकडील पत्र जा.क्र. जिग्रावियं/रायगड/आ-५/१४९/२०२४ दि. ०२.०७.२०२४
२. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पालघर यांचेकडील पत्र जा.क्र. जिग्राविय/पालघर/प्रमंआयोग्रा/२६९/२०२४ दि. ०८.०७.२०२४
३. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, रायगड यांचेकडील पत्र जा.क्र.जिग्राविय/रायगड/आ-५/२१८/२०२४ दिनांक २८.०८.२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १, २ आणि ३ अन्वये जिल्हा रायगड आणि पालघर यांनी यांनी केंद्र पुरस्कृत PM-JANMAN या योजने अंतर्गत पूर्ण करण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी कार्यरत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधन कशा प्रकारे अदा करावे? याबाबत मार्गदर्शन मागितले होते.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण सह राज्य पुरस्कृत आवास योजने अंतर्गत ४ टप्पामध्ये निधी लाभार्थी यास वितरित करण्यात येतो. त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यास ३ टप्प्यामध्ये (Plinth, Lintel & Completion) मानधन अदा केले जाते. त्याच धर्तीवर केंद्र पुरस्कृत PM-JANMAN देखील राबविण्यात येते. तथापि, या योजने अंतर्गत ३ टप्पामध्ये निधी लाभार्थी यास वितरित करण्यात येतो. असे असले तरी, इतर ग्रामीण गृहनिर्माण योजनांप्रमाणे PM-JANMAN योजने अंतर्गत पूर्ण करण्यात येणाऱ्या घरकुलांसाठी राज्यातील सर्व कार्यरत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधनात सुसूत्रता राहावी या दृष्टीने त्यांचे मानधन ३ टप्प्यांमध्येच अदा करण्यात यावे. याबाबतचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१. पहिला हप्ता प्राप्त घरकुलाच्या जोत्यापर्यंत काम (Plinth) पूर्ण झाल्यानंतर = रु. ३८० /-
२. घरकुल छज्जापर्यंत काम (Lintel) पूर्ण झाल्यानंतर = रु. ३८० /-
३. घरकुल शौचालयासह पूर्ण व अंतिम दाखला दिल्यानंतर (Completion) = रु. ३८० /-

**एकूण मानधन प्रति घरकुल = रु. ११४० /-**

तरी, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधन केंद्र पुरस्कृत PM-JANMAN आवास योजना सुरू झाल्यापासून अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

डॉ. राजाराम दिघे
संचालक
ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य

प्रत :-

१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व) यांना माहितीस्तव.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती, अहमदनगर, कोल्हापूर, नांदेड, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, रत्नागिरी, वर्धा, सातारा, गडचिरोली, नाशिक, पालघर, पुणे, ठाणे, रायगड व यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
५. CSC E- Governance Services India Limited, Mumbai – २७ यांना पुढील कार्यवाहीस्तव.